# युरोपातील जगप्रसिद्ध कथा

अनुवाद

**सुजाता पाटील**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**युरोपातील जगप्रसिद्ध कथा**
सुजाता पाटील

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
सुजाता पाटील

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ १८०/-

# युरोपातील जगप्रसिद्ध कथा

युरोपातील जगप्रसिद्ध कथा
युरोपातील जगप्रसिद्ध कथा

# कथानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | आशा...*(प्रेडिका ब्रेमर)* | ७ |
| २. | जंगलातील रहस्य...*(गस्टोफ मेजरस्टेव)* | २१ |
| ३. | शाही अभिवादन...*(डेयिल फालस्टोर्म)* | २८ |
| ४. | केरन...*(एलेक्जेंडर किलैंड)* | ३५ |
| ५. | गोष्ट एका आईची...*(हंस क्रिचन ऐंडरसन)* | ४१ |
| ६. | ते अज्ञात लोक...*(जुहानी अहो)* | ४७ |
| ७. | मला मदत करणारे माकड...*(एलेक्जेंडर किलैंड)* | ५२ |
| ८. | पिता...*(बजोंट्सजर्ने बजोंर्सन)* | ५८ |
| ९. | गिटजे...*(कोनार्ड बसकेन ह्यूट)* | ६२ |
| १०. | छोटा संगीतकार-जेनको...*(हेरनिक सेनकीविच)* | ६८ |
| ११. | युक्ती...*(गॉय दी मोपासाँ)* | ७७ |
| १२. | पितृहत्या...*(गॉय दी मोपासाँ)* | ८३ |
| १३. | विल्ली नृत्य...*(जोहन मेलऐथ)* | ९१ |
| १४. | शोध शुक्राचा...*(आरपाड बरजिक)* | ९८ |
| १५. | पहिली इच्छा...*(एहसान मुसलिफ बजुर्ग)* | १०५ |
| १६. | प्राणघातक शत्रू...*(स्वेटोजार चोरोविच)* | ११० |
| १७. | कोसमा रकोरे...*(माइकल सेंडोविनू)* | ११७ |
| १८. | राजकुमारी आणि चर्मकार...*(नामवर मुसन्निफ)* | १२६ |
| १९. | प्रतिज्ञा...*(समरसेट मॉम)* | १३४ |
| २०. | मोत्यांची माळ...*(समरसेट मॉम)* | १४२ |
| २१. | ठकास महाठक...*(गुमनाम)* | १५१ |


✦✦✦

# आशा

***– प्रेडिका ब्रेमर***

जीवनात कठीण वाटेवर कमी-अधिक कष्ट घेऊन फिरण्याचा माझा एक आगळावेगळा असा विलक्षण छंद होता. तसाही मी पूर्वी शारीरिक आणि नैतिकदृष्ट्या फायद्याचे म्हणून अनवाणी पायानेच फिरत असे. मी नेहमीच आशावादी असे. माझ्या दररोज सकाळच्या आशा संध्याकाळवर अवलंबून असत, संध्याकाळच्या आशा पुन्हा सकाळवर अवलंबून असत. पानगळीच्या आशा वसंत ऋतूवर आधारलेल्या तर वसंत ऋतूच्या पानगळीवर. या वर्षीच्या आशा पुढच्या वर्षावर. अशा प्रकारे अनेक अडचणींना तोंड देत केवळ आशेच्या बळावर माझ्या आयुष्याची जवळजवळ तीसएक वर्षे निघून गेलीयत. तरीही बाहेरच्या जगात मी स्वत:ला खूप धाडसी समजे; पण घरात मात्र माझ्या बधीर झालेल्या टाचेमुळे एका कोपऱ्यात अंग मुडपून बसावं लागे. अशावेळी कुणाचे तरी सहानुभूतीचे शब्द माझ्या मनाला नवी उभारी देऊन जात.

जगातील हजारो व्यक्ती ज्याप्रमाणे आजचं दु:ख विसरून भविष्यातील सुखस्वप्नं बघत राहतात त्यातलाच मीही एक होतो– 'नियोजित वेळ आली की कोणीतरी गुरू भेटतोच' या उक्तीवर विश्वास ठेवून होतो.

एका तद्दन ग्रामीण ख्रिस्ती धर्मप्रचारकाना साहाय्यक असल्यामुळे तुटपुंजा पगार व अनंत गैरसोई झेलत कशीबशी गुजराण करणं; त्याचबरोबर सतत शिव्याशाप देणाऱ्या घरमालकाशी मिळतंजुळतं घेत राहणं, दारूच्या व्यसनात पूर्णपणे बुडालेल्या भ्रष्ट धर्मप्रचारकाकडून सतत भलं-बुरं ऐकूण घेणं, सतत मूर्ख आणि असंस्कृत तरुणांमध्ये वावरणं आणि घरातल्या अत्यंत गर्विष्ठ मुलींना झेलत राहणं; एकंदरीत अशा प्रकारे मी माझं आयुष्य ओढत होतो. या परिस्थितीत एका ओळखीच्या व्यक्तीकडून मिळालेली

एक बातमी मात्र माझ्या मरगळलेल्या मनाला प्रफुल्लित करून गेली. ज्यांच्याशी माझं तसं फारसं काही सख्य नव्हतं असे स्टॉकहोममध्ये राहणारे माझे काका मरचीट पी. हे मरणोन्मुख अवस्थेत असून त्या समयी ते माझी आठवण काढत होते, असं मला कळलं. शेवटी कितीही नाकर्ता असलो तरी मी त्यांचा नातलग होतो ना!

एक छोटेसे गाठोडे आणि अनंत आशा सोबत घेऊन हा कृतघ्न भाचा खेडेगावातील खटारा गाडीतून कष्टमय प्रवास करून राजधानीत येऊन पोहोचला.

जिथं मी उतरलो होतो तिथे मी माझ्यासाठी अगदी थोड्याशा नाश्त्याची ऑर्डर दिली. थोडासा म्हणजे एक डबल रोटी आणि काही अंडी-बस्स इतकाच.

तेथील घरमालक आणि त्यांच्यासोबत असणारा एक गलेलठ्ठ माणूस माझ्या खोलीत इकडून-तिकडे आणि तिकडून-इकडे फिरत होते.

तो गलेलठ्ठ माणूस म्हणाला, ''मी नक्कीच असं म्हणेन की, हा मरचीट पी. जो परवाच गेला तो खूप चांगला माणूस होता.''

''हो, हो. मीही खूप विचार केला. खरंच तो एक चांगला माणूस होता आणि त्याच्याजवळ पुष्कळ संपत्तीही होती.''

''ऐकलास का माझ्या मित्रा? (वेटरला) तू माझ्यासाठी हरणाचे मांस किंवा त्यासारखीच काहीतरी जबरदस्त डिश आणशील का? आणि हो, सूप घेऊन यायला विसरू नकोस. जरा लवकर ये.''

घरमालक म्हणाला, ''हो, खूप मोठी रक्कम आहे. सहा हजार पाऊंड. जगातील कोणतीही व्यक्ती सहा हजार पाऊंडचे स्वप्नदेखील पाहू शकत नाही.''

''सहा हजार पाऊंड!'' रक्कम ऐकून मला केवढा आनंद झाला. सहा हजार... ''वेटर, जरा लवकर आणि हो माझ्यासाठी सहा हजार... नाही-नाही, म्हणजे माझ्यासाठी एक ग्लास दारूही आण.''

आता माझ्या मनात तुतारीच्या प्रत्येक स्वराबरोबर मेंदूपासून हृदयापर्यंत सहा हजाराचे गाणे चालू झाले.

''हो,'' त्या गलेलठ्ठ माणसाचे बोलणे चालूच होते, ''तुम्ही विश्वास नाही ठेवणार, एकशे ऐंशी पाऊंड कटलेटचे आणि एक हजार पाऊंड रौंप्पनची उधारी आहे. ते सारे देणेकरी लोक पैशासाठी आशेने उभे आहेत. घरातील साऱ्या

वस्तूंची मिळून किंमत फार-फार तर अर्धा पैनी होईल. घराबाहेर नावालाच फक्त गाडी आहे.''

''अरे बापरे! काहीतरी वेगळंच दिसतं हे! वेटरऽऽ इकडे ये, हे जेवण जे तू आत्ता दिलंस, हे मांस, सूप आणि ही दारू, हे सगळं परत घेऊन जा. नीट बघ, यातील एकाही पदार्थाला मी स्पर्शदेखील केलेला नाही. मी खाणार तरी कसा? अगदी सकाळी उठल्यापासून मी काय मिळेल ते फक्त खातच आहे. (पूर्ण खोटं) तेव्हा माझ्या लक्षात आलं की आपण जेवणावर का पैसे खर्च करायचे.''

''अहो, पण तुम्हीच तर ही ऑर्डर दिली होती.'' वेटर जरा चिडक्या स्वरात बोलला.

''अरे माझ्या मित्रा, मी सांगितले आणि तू लगेच कानावरच काय मनावरही घेतलंस आणि हे सारे पदार्थ घेऊन आलास; पण तुला एक सांगू का? कान हे असे स्थान आहे जे अडचणीच्या वेळेत मदतीला धावून येतात. अरे, मला मान्य आहे की माझं चुकलं आहे आणि मला शिक्षाही व्हायलाच हवी; पण यात माझा दोष नाही. मी एका श्रीमंत वारसदारासाठी हा नाश्ता ऑर्डर केला होता; पण तो अचानक गरीब झाला. खूप खूप गरीब झाला. त्यानं अर्ध्याहून अधिक भविष्यकाळ वर्तमानातच संपवून टाकला आहे. अशा परिस्थितीत तो या महाग नाश्त्याचे पैसे कसे देणार? तूच सांग. परंतु जी रोटी आणि अंडी मी खाल्ली आहेत त्याचे पैसे देण्यात मला कोणतीच अडचण नाही. तू माझ्यासाठी जे कष्ट घेतलेस त्या मोबदल्यात मी तुला काहीतरी चांगली वस्तू देऊ शकतो; परंतु सध्या मला काहीतरी कामानिमित्त लगेच निघावे लागेल.''

मग मी स्वत:च स्वत:च्या दुसऱ्या मनाचे सांत्वन करून, सोबत आणलेले गाठोडे काखोटीला मारून तिथून बाहेर पडलो. एका नवीन आणि स्वस्त अशा घराच्या शोधात!

स्वप्न आणि वास्तव यांची समोरासमोर झालेली टक्कर पाहून माझं डोकं प्रचंड दुखू लागलं. फिरता फिरता माझे लक्ष एका सुंदर गाडीकडे गेले. त्या गाडीतून एक नखरेल पुरुष खाली उतरला. त्याचा रंग गव्हाळ होता. त्याच्या गहिऱ्या डोळ्यात रसिकता चमकत होती. ते गृहस्थ मला ओळखीचे वाटत होते. हो, त्यांची आणि माझी ओळख कॉलेजच्या दुसऱ्या वर्गात झाली होती. वाढलेलं

वय आणि थकलेला देह यामुळे तो असा काही चालत होता की, कोणत्याही क्षणी तो तोंडावर पडेल असं वाटत होतं. ते पाहून मी डोके हातांनी गच्च धरले आणि जोरात श्वास घेतला. त्या श्वासाबरोबर तिथं तळल्या जाणाऱ्या भज्यांचा वास माझ्या नाकातून अगदी हृदयापर्यंत गेला. जणू काही माझ्या आर्थिक दुर्बलतेची आणि स्वच्छ मनाची तो प्रशंसाच करत होता.

शेवटी एका छोट्याशा गल्लीत एक छोटेसे घर मला मिळाले. माझ्या भविष्यातील अंधारापेक्षा ते खूप छान होते.

मी ज्याप्रमाणे स्टॉकहोममध्ये शरद ऋतू घालवायचा ठरवला होता वस्तुस्थिती आता त्याच्या उलट झाली होती. काय करावे काहीच कळत नव्हते. आत्मविश्वास गमावणे ही खरंच खूप वाईट गोष्ट आहे. रिकाम्या हातांनी फक्त आकाशाकडे पाहत राहायचे हेही चांगले नाहीच. सूर्योदय हा कुणाच्या इच्छेवर अवलंबून नसतोच.

पावसाळ्याचे दिवस होते. काळ्या काळ्या ढगांनी आकाश भरून आले होते. शक्य त्या सगळ्या साधनांचा वापर करायचा आणि इथून पुढे चांगल्या प्रकारे आपली उपजीविका चालवायची असे मी ठरवले- त्याचबरोबर आयुष्यात घडणाऱ्या बऱ्यावाईट घटनाही शब्दबद्ध करायच्या असं मी ठरवलं.

संपूर्णत: प्रामाणिकपणे केलेलं हे लेखन मी अशा लोकांना वाचून दाखवण्यासाठी धडपडत होतो. ज्यांच्याकडं खरं सांगायचं तर हे ऐकण्यासाठी कानच नव्हते. या प्रयत्नात मी माझे अनेक दिवस अगदी फुकट घालवले. माझा आहार तर कमी होत गेला पण आशा मात्र वाढतच राहिल्या.

चार महिन्यांचे थकित घरभाडे प्रथम आणून द्यावे; अन्यथा आपले सामान रस्त्यावर टाकण्यात येईल, अशी प्रेमळ धमकी देऊन माझा घरमालक नुकताच निघून गेला होता. नोव्हेंबर महिन्यातला तो सुंदर शरद ऋतू! एका आजारी मित्रासाठी खिशात होते नव्हते तेवढे सगळे पैसे खर्च करून जेव्हा मी घरी आलो. तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते आणि आल्याआल्याच ही स्तुतिसुमनं माझ्यावर उधळली गेली होती.

एक दीर्घ श्वास घेऊन, ''होतं ते चांगल्याचसाठी...'' असं म्हणत खिडकीजवळ असलेली एक मोडकी खुर्ची मी जवळ ओढली. बाहेर पाऊस